
SN 2394-5303

Printing Area
UGC
Jr.No.43053
UGC Approved Refereed Journal

# प्रिंटिंग एरिया ™

International Multilingual Research Journal

Issue-34, Vol-06 , October 2017



Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

# Index

01) A STUDY ON CULTURAL PROSPECTS AND CHALLENGES OF THE SONOWAL KACHARIES....
**Pradip Chandra Das, Digboi, Tinsukia, Assam** || 10

02) Professional Ethics: Practices, Problems & Policies
**Dr. Rajeshkumar I. Bhatt, Anand, Gujarat** || 14

03) From Alice to Potter: Perspectives on Children's Literature
**Mrs. Pinal Doshi, , Ahmedabd** || 18

04) Role of Rural Entrepreneurship in Economic Development
**Dr. Subhash.K. Zinjurde, Ahmednagar.** || 23

05) A Study of academic achievement of students with context to....
**Ku. Anjali S. Wankhade** || 29

06) Speeches of M.P. Devkinandan Narayan Chakravartiin Rajyasabha : with Spl. Reference....
**Dinesh R. Mahajan, Dist.Jalgaon (Maharashtra)** || 31

07) Muslim Leadership in Indian Politics
**Mohd Sardar, Hyderabad** || 34

08) Socio-Economic conditions ofMuslim Minority Girls Pursuing College Education- A study of....
**Mohamad Mustafa A. Mujawar-Dr. Chandrashekar C. Banasode** || 40

09) Measures to improve profitability in Banking with special reference to AXIS....
**Rakesh Munje, Indore** || 43

10) Leadership behavior and performance: A case study of......
**Dr. Dheeraj Negi—Smt. Shweta Pancholia, M.P.** || 46

11) Alleged Misuse of Section-498A IPC: Need for Amendment
**Dr Monika Negi—Dr Virender Negi.** || 50

12) ROLE OF MOTIVATION IN ENGLISH LANGUAGE TEACHING
**Dr. G. Sujatha, Machilipatnam** || 58

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

25) महार संतांच्या अभंगातील दलिततत्त्व
प्रा. डॉ. के. के. अहिरे, भुसावळ || 117

26) जैनकालीन शिल्पकला व स्थापत्य
डॉ.आर.व्ही.ढेरे, जिल्हा पुणे. || 121

27) संताची पर्यावरण दृष्टी
प्रा.डॉ.ममता इंगोले (महल्ले), पातूर,जि.अकोला || 124

28) कॉ. डांगे यांची विधानसभेतील भूमिका
संजय पाटील, चोपडा || 133

29) आष्टी तालुक्यातील डाळींब फलोत्पादन शेतीचा विकास आणि समस्या—एक————
प्रा. श्रीमती एम.एस. टेकाडे—प्रा. डॉ. मधुकर गणपतराव राजपंगे || 138

30) अभिवृत्ति:एक मानसिक समप्रत्यय
अनुज कुमार, अलवर (राजस्थान) || 141

31) डॉ. कैलाशचन्द्र शर्मा के नाटकों का कथ्य वैविध्य
प्रा. निंबा लोटन वाल्हे, तह. शिंदखेडा, जि. धुले || 143

32) पंचकोश एवं आध्यात्मिक विकास:उपनिषदों के परिप्रेक्ष्य में
इन्द्राणी त्रिवेदी, हरिद्वार। || 147

33) प्राचीन काल में बौद्ध शिक्षा का क्रमिक विकास:एक अवलोकन
डा० अलका तिवारी, लखनऊ || 152

34) पंजाबी लोक गीतों में पंजाबन की वेदना
डॉ. कुलविन्द्र कौर छीना, दीनानगर। || 158

35) स्वतंत्रता आन्दोलन और हिन्दी
डॉ. मोनिका मिश्रा, जयपुर (राजस्थान) || 163

36) छत्तीसगढ़ राज्य में महिलाओं के विकास के राज्य महिला आयोग की भूमिका
डॉ. दुर्गा महेश्वरी (सोनी), जिला—धमतरी (छ.ग.) || 169

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area International Research Journal | October 2017 Issue-34, Vol-06 | 0124

27

# संताची पर्यावरण दृष्टी

प्रा.डॉ.ममता इंगोले (महल्ले)
सहयोगी प्राध्यापक,
डॉ. एच.एन.सिन्हा महाविद्यालय, पातूर,जि.अकोला

***********

**१) प्रस्तावना–**

भारतीय संस्कृतीत संत परंपरा ही जमेची बाजू आहे. संतांनी जे विचार समाजाला दिले ते केवळ एका व्यक्तीकरीता, एका जातीकरीता, एका पंथाकरीता, एका धर्माकरीता अथवा एखादया विशिष्ट काळापुरता मर्यादीत नव्हते. तर संताचे विचार सर्वसमावेशक व कालातीत आहेत. माणूस ज्या ज्या वेळी दिशाहीन झाला त्या त्या वेळी संतांनी त्याला दिशा दाखविण्याचे काम केले आहे. "मानवाचे आध्यात्मिक जीवन समृध्द होण्यासाठी संतांनी भक्तितत्व, अध्यात्मचिंतन आणि तात्वीक मूल्यांची शिकवण दिली. तसेच ज्या देहाचे आधारे परमात्म स्वरूपाकडे जायचे आहे, तो देह निरोगी, सुदृढ, प्रसन्न, आनंदी राहावा यासाठी पर्यावरणाचे मोठेपण सांगितले आहे. ज्याच्या सान्निध्यात मानवी देह वावरणार आहे ते निसर्गसान्निध्य विपुल, व्यापक आणि शुध्द असला पाहीजे ही संतांची धारणा आहे. एकीकडे भारतात अनंत काळापासून नांदत आलेली कृषिसंस्कृती आणि तत्ववेत्यांनी सांगीतलेले पंचमहाभूतांचे महत्त्व या दोहोतून पर्यावरणाच्या संदर्भातील चिंतन प्राचीन ग्रंथात आणि संत साहित्यात प्रभावीपणे मांडलेले पहावयास मिळते. जीवन जगताना, निसर्गात वावरताना अवतीभोवती दिसणारे, जाणवणारे पर्यावरणाचे घटक सर्वसामान्यांच्या परिचयाचे आहेत. वश्क्ष, वल्ली, डोंगर, नदी, फुले, फळे, पशू, पक्षी, वारा, सूर्य, चंद्र, तारे, कीटक, गायी, गुरे, वने, अरण्ये, पाऊस इ. घटकांना कधी रूपक, कधी उपमा, कधी सिध्दांत, तर कधी दृष्टांत अशा स्वरूपात ठायी ठायी मांडून आपल्या वाङ्मयातून मराठी संतांनी पर्यावरणाची नवी दृष्टीच दिली आहे." संतांचे पर्यावरणविषयक विचार अत्यंत मोलाचे व कालातीत असे आहेत. आज पर्यावरणाचे बिघडत चाललेले संतुलन राखण्यासाठी संतांनी जे पर्यावरण विषयकविचार मांडले आहेत ते निश्चितच फायदेशिर ठरणारे आहेत. त्यांच्या विचारांना आपल्या जीवनात स्थान देऊन त्यांची अंमलबजावणी केल्यास ढासळणाऱ्या पर्यावरणाला तोंड देण्याची शक्ती आपल्यात निर्माण होईल.

**२) पध्दतीशास्त्र–**

पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबविण्याकरीता आवश्यक बाबी संतांच्या विचारांमधून आपल्याला मिळतात. संतांच्या अभंगातून आलेले पर्यावरणविचार जागतीक तापमान वाढीच्या समस्येवर उपाय सुचविणारे आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनाकरीता संशोधकाने 'संतांचा पर्यावरणविचार' हा विषय निवडला आहे. पर्यावरण, ढासळलेले पर्यावरण आणि ढासळत्या पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी दिशा देणारे पर्यावरण संदर्भातील संतांचे विचार या त्रिसूत्रातून प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

**३) गृहीतकृत्ये–**

१) संतांच्या अभंगातून पर्यावरणविचार पदोपदी जाणवतात.

२) संतांच्या अभंगातून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासंबंधीची दिशा मिळते

३) संतांच्या विचारांची अंमलबजावणी करून पर्यावरणाचा समतोल राखता येईल

४) संतांचे पर्यावरणविषयक विचार वसुंधरेच्या रक्षणासाठी उपयोगी ठरतील.

**४) संशोधनाचा उद्देश–**

मानवाने आपल्या स्वार्थासाठी चालविलेल्या पर्यावरण ऱ्हासामुळे पृथ्वीचे पर्यायाने मानवाचेच जीवन संकटात सापडलेले आहे. अशावेळी पर्यावरणविषयक जनजागृतीसाठी संतांचे विचार प्रेरक ठरतात. या पार्श्वभूमीवर त्यांनी दिलेले पर्यावरणविषयक विचार मानवाच्या जीवनासाठी तसेच प्रदुषणरूपी राक्षसापासून वसूंधरेला वाचविण्यासाठी महत्वाचे ठरतात. हे अनमोल विचार जाणून घेणे हा या संशोधना मागचा उद्देश आहे.

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area International Research journal | October 2017 Issue-34, Vol-06 

५) संशोधन—

५ अ) पर्यावरण—

सर्वसाधारणपणे पर्यावरण सभोवतालची परिस्थिती असे असले तरी उत्पत्तीशास्त्राच्या दृष्टीने पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील विशिष्ट भागाशी निगडीत असलेली सभोवतालची परिस्थिती होय Environ म्हणजे To Surround या मुळ फ्रेंच भाषेतील शब्दापासून 'Environment' अशी इंग्रजी शब्द प्रचलीत झाला आहे. यालाच मराठी भाषेत पर्यावरण असे म्हणतात. पर्यावरणाच्या काही व्याख्या पुढील प्रमाणे—

**१) हर्सकोव्हिट एम.जे.:** पर्यावरण म्हणजे सर्व बाहय परिस्थितीचे आणि प्रभावाचे एकत्रिकरण आहे, जे पृथ्वीच्या पृष्ठभागावर सजीवांच्या विकासचक्राला प्रभावित करत असते.

**२) पार्क सी:** विशिष्ठ वेळी, विशिष्ठ ठिकाणी मानवाला वेढणारी जी नैसर्गीक किंवा सांस्कृतीक परिस्थितीची एकात्मीक अवस्था असते तिलाच पर्यावरण असे म्हणतात.

**३) जैकी स्मिथ :** सजीवाने अनुभवलेल्या प्राकृतिक, रासायनिक व जैविक परिस्थितीची गोळाबेरीज म्हणजेच पर्यावरण. त्यात हवामान, मृदा, जल, प्रकाश, आसपासच्या वनस्पती, सजीवाच्या स्वत:च्या जातीचे अन्य सदस्य तसेच इतर सजीव जातीचे सदस्य यांचा समावेश होतो. पर्यावरणाची स्थिती, दिवसाची वेळ, ॠतु, हवास्थिती व अन्य घटकानुसार बदलते.

**४) विश्व शब्दकोश :** पर्यावरण त्या सर्व परिस्थिती, प्रणाली (तंत्र) व प्रभावांचे एकत्रिकरण आहे जे सजिवांच्या व त्यांच्या प्रजातीच्या विकास, जीवन व मृत्युला प्रभावित करीत असते.

एकंदरीत पर्यावरण ही संकल्पना अतिशय गुंतागुंतीची आणि बहुव्यापक आहे. सर्वसामान्यपणे पर्यावरण ही संकल्पना निसर्ग या अर्थानेही रूढ मानली जाते. त्यामुळे पर्यावरण ही प्राकृतिक आणि जैविक संकल्पना आहे. ज्यामध्ये पृथ्वीवरील जैविक व अजैविक घटकांचा समावेश होतो. जैविक घटकांचे पृथ्वीतळावरील अस्तित्व निसर्गनियमांनी बध्द अशा संतूलित परिसंस्थावर अवलंबून आहे. विविध परिसंस्थातील समतोल निसर्गनियमावर आधारभूत असतो. `पर्यावरणातील मानवाच्या अतिरेकी हस्तक्षेपांमुळे प्रदूषण, नागरीकरण, उर्जाक्षय, वृक्षतोड, अवर्षण, ओझोनक्षय इत्यादी सारख्या भयानक समस्या निर्माण झाल्या आहेत.

पर्यावरणाचा समतोल टिकून राहणे हे पृथ्वीवरील संपूर्ण सजीवदृष्टीच्या अस्तित्वासाठी अत्यंत गरजेचे आहे. मानव हा पर्यावरणातील एक क्रियाशील व बुध्दिमान प्राणी असून तो पर्यावरणाचा एक अविभाज्य घटक आहे. त्यामुळे पर्यावरण रक्षणाची जबाबदारी मानवाचीच आहे. पर्यावरणीय समस्या निर्माण होण्यासाठी मानव हाच एकमेव घटक कारणीभूत आहे. पर्यायाने पर्यावरण संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी मानवाची आहे. यासाठी समाजात जनजागृती निर्माण होणे ही आजच्या काळाची गरज आहे.

५ ब) ढासळलेले पर्यावरण—

वृक्षवल्ली, जंगल, अरण्ये, वने, पशुपक्षी, नदी, डोंगर, निसर्ग यांचे महत्व ॠषीमुर्नीनी व साधूसंतांनी ओळखले होते. निसर्गात वावरणारे पशुपक्षी झाडे हे देवांचे अवतार किंव देवांची वाहने आहेत अशी त्यांची श्रध्दा होती. झाडे तोडल्यामुळे किंवा प्राण्यांची हत्या केल्यामुळे देवदेवतांचा कोप होईल अशी त्यांना भिती वाटत होती. त्यामुळे त्याकाळी भारताच्या एकूण जमीनीपैकी ४७ टक्के जमीन जंगलांनी व्यापलेली होती. अगणित पशुधन सुखाने नांदत होती. परंतू भारतात इंग्रजांची सत्ता सुरू झाल्यापासून येथील श्रध्देवर आक्रमण केले. देवीचे वाहन म्हणून ज्यांच्याकडे श्रध्दायुक्त भितीने पाहिले जायचे अशा हजारे वाघ, सिंहाची शिकार केली. गेल्या शतकात तर मानवाने सुधारणेच्या व निसर्गावर विजय मिळविण्याच्या हव्यासापायी जंगलाचा आणि वन्य प्राण्यांचा प्रचंड प्रमाणात विनाश केला. निसर्ग हेच परमेश्वराचे नांव आहे आणि वन्यप्राणी जीवन या परमेश्वराच्या विभूती आहेत ही भूमिकाच नाहीशी झाली. एकूण भूमीपैकी भारतात सध्या ८ टक्के भागावर जंगल शिल्लक राहीलेले आहे. शिकार, मांसाहार, युध्दा, अणुस्फोट, वायुगळती सारख्या मानवनिर्मित दुर्घटना यामुळे काही वन्यप्राणी, पक्षी, झाडांच्या व सरपटणाऱ्या प्राण्यांच्या जाती नष्ट होऊ लागल्या. पर्यावरणाचे संतूलन बिघडले, एके काळी समश्ध्द असलेले अरण्यजीवन संपुष्टात येवू लागले.

त्याचा परिणाम पाउसपाण्यावर पडू लागला. नियमित पडणारा पाऊस पळून गेला. वृक्षजीवन ओसाड झाले, झाडांची सावली गेली, झऱ्यांचे पाणी गेले, विहीरी आटल्या, नदया सुकल्या, दुष्काळ पडू लागले, गावेच्या गावे ओस झाली, डोंगरदऱ्यांचा परिसर सपाट होऊ लागला परिणामी तो भाग ओसाड झाला, भकास झाला, सृष्टीचे सौंदर्य हरवले आणि सदाहरित अशी सृष्टी काही वर्षातच वृध्दावस्थेसारखी सुकलेली दिसू लागली. मानवी जीवनावर त्याचा मोठा परिणाम होवू लागला आहे. निसर्गचक्र पर्यावरण संतुलनाचे महत्वाचे केंद्र होते. मात्र मानवाने त्यालाच उध्वस्त करून टाकले. निसर्गातील वस्तुपासून मानवाने आपल्या कल्पक बुध्दीने वेगवेगळे घटक निर्माण केले त्याचाच उपयोग पुन्हा तो करीत असे हे निसर्गचक्र पर्यावरणपुरक असे होते. एखादया मानसाने केळीच्या किंवा कुठल्यातरी पानावर जेवण केले आणि खाऊन झाल्यावर ते पान टाकून दिले. रस्त्याने जाणाऱ्या एखादा गाईने ते पान खाल्ले, आवश्यक तो भाग पचऊन उरलेले अवशिष्ट शेणाच्या रूपात बाहेर पडले, तेच शेण गोळा करून एखादया बाईने त्याची गोवरी केली तीच गोवरी वाळवून तीला जाळून चुलीवर स्वयंपाक शिजवीला. या सर्व प्रक्रियेत एक गोष्ट नाहीशी होऊन तिच्यातून दुसऱ्याचा जन्म ही नैसर्गीक क्रिया घडत गेली आणि हया चक्रामध्ये नैसर्गिक पध्दतीने विल्हेवाट लागणार नाही असे कोणतेच अवशिष्ट उरले नाही. म्हणून केळीच्या पानावरील खाद्यपदार्थ खाण्यापासून ते थेट गोवरी जाळण्यापर्यंत कुठेही प्रदुषण होईल अशी क्रिया झाली नाही. मात्र केळीच्या पानाऐवजी प्लॅस्टीकचा कागद वापरला असता तर निसर्गचक्राला बाधा पोहचेल त्या कागदामुळे प्रदुषण होईल.

निसर्गचक्राला मानवाने छेद दिल्यामुळे त्याचे दुष्परिणाम पहावयास मिळत आहेत. जागतिक तापमानात प्रचंड वाढझाली आहे. वाढते शहरीकरण, वृक्षतोड, नैसर्गिक जलचक्रातील बदल, ओझोन वायुचा क्षय, कार्बनडाय ऑक्साईडचे वाढते प्रमाण, विविध अणुचाचण्या, औद्योगीकरणाचा विकास, जलप्रदुषण, किटकनाशके व जंतूनाशके यांचा वाढता वापर, मातीची धुप, नैसर्गिक खनिजांचा व तेलांचा वाढता वापर, गतीमान मानव व अस्थिर पर्यावरण, धोक्यात आलेली हवामान परिसंस्था, जंगलकटाई, अतिचराई, स्वयंचलीत वाहनांचा वाढता वापर, वातानुकुलीत यंत्रे व शितकरण यंत्राचा अधिक वापर, आदि विविध कारणांमुळे जागतिक तापमानात वाढझाली आहे. परिणामी ज्वालामुखी, ढगफुटी, त्सुनामी, वाळुंचे वादळे, भुकंप, महापूर, दुष्काळ, विविध आजार, निर्माण झाले आहेत. या सर्वांचा फटका मानवालाच बसत आहे. प्रगतीच्या नावाखाली मानवाने निसर्गाची अडवणूक सुरू केली आहे. या वेगाने हवा, पाणी व जमीनीचे प्रदुषण होत गेले तर मानवांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल व त्याचे अस्तित्व आपोआपच नष्ट होईल.

निसर्गाचे चक्र जेंव्हा बिनबोभाटपणे फिरते तेंव्हा त्या चक्राच्या अस्तीत्वाची आपल्याला जाणीव नसते. फारसे महत्वही नसते जेंव्हा या चक्रात अनियमितता येते तेंव्हा मात्र गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण होत. मानवाच्या निसर्गात हस्तक्षेप वाढल्यामुळे अनेक धोके निर्माण झाले आहे. जागतिक तापमानातील वाढ हा त्यातीलच एक गंभीर धोका आहे. पृथ्वीच्या वातावरणात कार्बनचे प्रमाण ३७८ पी.पी.एम. आहे हे अत्यंत धोकादायम आहे. पृथ्वीवरील मानवाच्या विविध कृतीमधून अनेक कार्बनयुक्त वायु सुर्याची अतिरिक्त उष्णता वाढवून ठेवतात. त्यामुळे वातावरणाचे तापमान वाढते. तसेच पृथ्वी भोवतीच्या ओझोन थराला मोठमोठी भगदाडे पडल्यामुळे सुर्याची किरणे तिव्रतेने पृथ्वीवर पोहचत आहेत. त्याच परिणाम जागतीक तापमान वाढीवर होत आहे. जागतिक तापमान वाढीस कोणताही देश कारणीभूत असला तरी त्याचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागणार आहेत. यामुळे पर्यावरण व जैवसृष्टीवर गंभीर परिणाम होईल. उत्तर व दक्षिण ध्रुवावरील हिमनग वितळहून समुद्राच्या पातळीत वाढ होत आहे. त्यामुळे समुद्रकाठी असणाऱ्या शहरांना धोका निर्माण झाला आहे. हिमालयातील बर्फ बितळल्यास गंगा यमुना नदयांना केंव्हाही अनपेक्षीत पुर येवून विविध आजार फैलावण्याची शक्यता आहे. त्यानंतर या नदया कायमच्या कोरडया होतील. एकवीसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत जमीनीच्या उत्पादनक्षमतेत ३० टक्केपर्यंत घट होण्याची शक्यता

असल्यामुळे अन्नधान्य व पाणी टंचाई निर्माण होईल. निसर्गचक्रातील माणसाचा वाढता हस्तक्षेप हाच त्याच्या ऱ्हासास कारणीभूत बनला आहे. यातून सुटका करून घ्यायची असेल तर पुन्हा एकदा मानवाला निसर्गाशी वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या भावनेने नाते निर्माण करावे लागेल.

**५.क)संतांचा पर्यावरण विचार:—**

मराठी संतांनी पर्यावरणाचे महत्व फार पूर्वीच ओळखले होते. मानसाल निर्भेळ जीवन जगण्यासाठी शुध्द निसर्गाची साथ असायलाच हवी अशी संतांची धारणा होती. मानवी जीवन सुखसमृध्द व्हावे यासाठी काय करावे हे सांगतांना संत ज्ञानेश्वर म्हणतात,

"नगरेची रचावीं! जळाशयें निर्मावी
महावनें लावावी! नानाविधे !!१४।२३३।

समर्थ रामदास 'दासबोध' पंचमहाभूते आणि त्यातून निर्माण झालेले सृष्टीचक्र यांचे सूक्ष्म चिंतन करतांना म्हणतात,

"पंचभूतें झाले जग, पंचभूतांची लगबग।
पंचभूते गेलियां मग। कायें आहें"।१६, १०१।।

**१) वृक्षवेली संदर्भातील संतांचे विचार:—**

निसर्गातील महत्वाचा घटक वृक्ष, एखादया दात्याप्रमाणे मानवाला सतत काहीतरी देतच असतो म्हणून वृक्षांशी जवळीक करण्यासाठी संत एकनाथ म्हणतात,

"अतिथी आलिया वृक्षापासी।
वंचनार्थु न करी त्यासी।
पत्र पुष्प फल मूळ छायेसी। त्वचा काष्ठासी देतसे।।
तैसा वृक्ष समूळ सगळा।
अर्थियालागी सार्थक जाहला।
तैसे चित्ते वित्ते देहे बोला। साधु संतुष्टला
अर्थ्यासी।।" ए.भा.७।४०१.४०२।।

संतांनी तर निसर्गाला मानवाशी जोडण्याचा प्रयत्न आपल्या विचारातून केला आहे. त्यांच्या अनेक अभंगामधून निसर्ग डोकावतांना दिसतो. आज सामाजिक समरसतेसोबतच पर्यावरण रक्षणाची जाणीव समाजात दृढ होणे आवश्यक आहे. यासाठी फक्त कायदे करून भागणार नाही तर त्यासाठी समाजमन जागृत करावे लागेल. पर्यावरण रक्षणाची संवेदना निर्माण होणे अत्यंत महत्वाचे आहे. सभोवती असलेला निसर्ग हवा, पाणी वनस्पती, खनिजे पशु—पक्षी आदींचा पर्यावरणात समावेश होतो. पर्यावरण रक्षणाची सुरूवात आपल्याला या सभोवतीच्या रक्षणापासूनच करावे लागेल. संतांच्या अनुभूतीचे विश्व आणि जीवसृष्टीचे संबंध स्वयंभू स्वरूपाचा आहे. पंचमहाभूतांचा आणि जीवाच्या पंचज्ञानेद्रीय आणि पंचकर्मद्रीयांचा परस्परांशी अन्योन्य संबंध आहे. ही जाणीव जागृती दृढ होताच पर्यावरणातली मानव, प्राणी, पशु, पक्षी, वृक्ष, सागर, नदया, पर्वतराजी, हवा, पाणी इत्यादींच्या संरक्षण व संवर्धनविषयी संवेदना निर्माण होवून मानवाच्या हातून यथार्थ व्यवहार घडण्यास मदत होते. पर्यावरण रक्षणासाठी समाजपुरूषाला कार्यतत्पर करण्याचे काम तुकारामांनी केले, पर्यावरण हे माझे अविभाज्य अंग आहे, समग्र पर्यावरण माझ्या सेवेत रत आहे म्हणून मीही त्याच्या सेवेत रत व्हावे ही भावना दृढ होताच पर्यावरणातील वृक्ष—वल्ली, सागर, नदया पर्वतराजी, पशु, पक्षी, प्राणी ही सोयरी होतात, जीवलग मित्र होतातत्र पर्यावरणाविषयी आत्मीयता प्रेमभावना जागृत होवून सदैव आपल्या सेवेत असलेल्या पर्यावरणाविषयी रक्षणाची व संवर्धनाची जाणीव जागृती निर्माण होते. संवेदना निर्माण होते, पर्यावरणाविषयी अतूट नाते जुळते या जाणीव जागृतीने प्रेरित झालेले तुकाराम महाराज म्हणतात,

"वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें।
पक्षी ही सुस्वरें आळविती।१।।
येणें सुखें रूचें एकांताचा वास।
नाहीं कळो येत दुःख अंगा।।२।।
आकाश मंडप पृथिवी आसन।
रमे तेथे मन क्रिडा करी।।३।।
कथाकमंडलू देहउपचारा।
जाणवितो वारा अवसरू।।४।।
हरिकथा भोजन परवडी विस्तार।
करोनि प्रकार सेवूं रूची।।५।।
तुका म्हणे होय मनासी संवाद।
आपुलाचि वाद आपणासी" ।।६।। तु.गा.३०७

आपल्या अवतीभोवती बहरलेल्या वृक्ष—लता—वेली आपली सोयरे आहेत. त्यासोबतच मुक्त संचार करणारे पशुपक्षी आपले मित्र आहेत. संस्वर शब्दांनी पक्षीगण आपली करमणूक करतात. निसर्गाच्या

सहवासात सुख आहे, आनंद आहे. निसर्गाच्या सोबत राहित्याने ग्राम्य गुण–दोष अंगी जडत नाहीत. सूर्य चंद्राचे दिवे लावलेला आकाशाचा भव्य आणि निळसर मंडप आणि पृथ्वीचे परमपवित्र आसन या नैसर्गीक ऐश्वर्यांनि मन रममान होते. वृक्ष, लता, ओढे, वनांशी मन क्रिडा करते देह उपचारासाठ गोंधडी, पाणी पिण्यास भोपळ्याचा कमंडलू वेळेचे भान करवून देणारा मंद शितल वारा या साऱ्याविषयी जीवाभावाचे नाते जुळते. शांत निवांत निसर्गाच्या सानिध्यात मनाचा मनाशीच संवाद होवून मनाचा विकास होण्यास, आत्मविकास होण्यास हातभार लागतो. मानवाच्या मानसिक, आत्मीक विकासास सहाय्यभूत ठरणाऱ्या निसर्गाचे, पर्यायाने पर्यावरणाचे रक्षण करणे मानवाचे आद्य कर्तव्य ठरले पाहीजे, सोयऱ्याशी ज्या आपुलकीने, प्रेमाने आपण वागतो तसे आपुलकीचे, प्रेमाचे नाते निसर्गाशी असले पाहीजे. त्याच भावनेने निसर्गाचे, पर्यावरणाचे, वृक्षांचे रक्षण केले पाहीजे, संवर्धन केले पाहीजे असेही तुकाराम महाराज सुचवितात.

पर्यावरणाचा घटक म्हणजे वृक्ष, वेली. हया घटकाचे जतन, संगोपन, संवर्धन करून पर्यावरणाचा समतोल राखला पाहीजे असे विचार अध्यात्माच्या अनुषंगाने तुकाराम महाराज सर्वासमोर मांडतात. जीव–शीव–ऐक्य हा अध्यात्माचा मुख्य सिध्दांत तुकोबारायांनी तरू आणि बिजाच्या रूपातून समजावून दिला आहे,

"तरूवर बीजापोटी। बीज तरूवरासेवटी।
तैसें तुम्हां आम्हां जालें।
एकीं एक सामावले"।। तु.गा.१७१८

तर या विचारांचा धागा घेवून ज्ञानेश्वर महाराज दृष्टांत देतात–

"बीज मोडे झाड होये। झाड मोडे बीजी सामायें।
ऐसेनि कल्पकोडी जाये। परि जाति न नशे"।।
ज्ञाने १७/५९/।।

याच संदर्भात सांगतांना समर्थ रामदास स्वामी म्हणतात–

"बीज फोडून आणिलें मना। तेथें फळ तों दिसेना।
वाढत वाढत पुढें नाना। फळे येती"।।
दासबोध १७/२/१३।।

बीजाच्या पोटामध्ये उत्तम वृक्ष सुक्ष्मरूपाने अस्तित्वात असतो आणि बीजामधून प्रकट झाल्यानंतर, त्याचा पुरता विकास झाल्यानंतर अखेरीस त्या वृक्षापासून बीज निर्माण होत असते.

'फळे तेचि बीज बीज तेची फळ।
उपमानावे मूळ न पालटे।' २४२७।

'बीज म्हणजेच फळ आणि फळ म्हणजेच बीज' अशी या दोघांमध्ये अभिन्नता आहे. बीज आणि फळ ही त्याची फक्त उपनावे आहेत. बीज हेच कोणत्याही वनस्पतीचे सारभूत तत्व होय. बाकीचा विस्तार मधेच येतो आणि नंतर लश्प्तही होतो हा आशय सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,

"तुका म्हणे बीजें बीज दाखविले।
फल पुष्प आले गेले वाया"।। तु.गा.३५५८।।

बीज अंकूरापासून फळापर्यंत नाना रूपे धारण करते, पण अखेरीस स्वत:च सारखे बीजच दाखविते. एका दृष्टीने मधे आलेली पाने, फुले, फळे ही जणू काही वायाच जातात. सैध्दांतिक दृष्टया स्वरूप ठरविण्याच्या तात्वीक दृष्टीने पाहता हा सगळा प्रवास बीजापासून बीजापर्यंत असतो. तसे पाहिजे तर पाने, फुले, फळे वाया जात नाहीत. त्यातूनही सृष्टीचे एक देखणे लावण्यच व्यक्त होते. पण या सर्व पदार्थाचे मूलभूत तत्व ठरवितांना बीज तत्वालाच प्राधन्य दिल्या जाते. अशा बीजाच्या संवर्धनासाठी ते आवाहन करतात की, बीजे बीज वाढवा' १२०९।। पर्यावरणाचा समतोल राखल्या जावा, जगाला वृक्षदान देण्यासाठी बीजाला स्वत:चे समर्पण दयावे लागते, जीवीत्वाची आहूती दयावी लागते. मानव मात्र बीजाच्या समर्पणाला समजून घेत नाही आधूनिकतेच्या हव्यासापोटी बीजाच्या आहुतीतुन निर्माण झालेल्या वृक्षांची कत्तल करून त्यांच्या समर्पणाची थट्टाच उडवतो.

"एका बीजा केला नास। मग भोगिले कणीस
लाभ नाही फुकासाठी। केल्यावीण जीवासाठी
तुका म्हणें रणीं। जीव देतां लाभ दुणी"।तु.गा.३५५८।।

बीज स्वत:च्या गाभ्यामधून अंकुराला जन्म देते, ते त्या अंकुराला जन्म दिल्यानंतर स्वत: मातीमध्ये विलीन होउन जाते. एकीकडे एका बीजाचा नाश होतो पण दुसरीकडे त्याच्या अस्तित्वाचा अंश असलेले पाच पन्नास, शे–दोनशे दाण्यांनी ओतप्रोत भरलेले

कणीस निर्माण होते. बहरलेले कणीस हवे असेल तर एका बीजाला आत्मनाश करून घेणे अपरिहार्य आहे. कोणाचा तरी जीव समर्पीत केला जातो आणि त्याचा आत्मसर्पणाची फळे इतरांना चाखायला मिळतात. सैनिकाचे रणांगणात आत्मसमर्पण होते आणि त्या आत्मसमर्पणातून देशाचे रक्षण केले जाते. मानवाने बीजाच्या आत्मसमर्पणाला समजून घ्यावे. आत्मसमर्पणातून निर्माण झालेल्या वृक्षराजीवर कुऱ्हाड चालवू नये. वृक्ष संगोपन करून स्वतःचे, तसेच पर्यावरणाचे जतन, संगोपन करावे. 'बीजाऐसी फळे' निर्माण होत असतात. ज्या बीजातून वृक्ष वाढणार आहे ते बीज शुध्द असायला हवे असेही ते सुचवितात,

"शुध्दबीजा पोटीं। फळें रसाळ गोमटीं"

।तु.गा.२०६२।।

शुध्द बीजापोटीच रसाळ आणि चांगली फळे मिळतात. संकरातून निर्माण झालेल्या फळांमधला कमी होत गेलेला गोडवा आज आपण अनुभवतो आहे. संकरामुळे फळांच्या, भाज्यांच्या मूळ चवीत बदल झालेला आहे. शुध्द बीजापासून शुध्द रूपाचेच फळ तयार होते हे सांगतांना ते म्हणतात,

"अमृताचि फळें अमश्ताची वेली।
ते चि पुढें चाली बीजाची ही"।। तु.गा.२०२९।।

अमृतांच्या वेलीला आलेल्या अमृतफळापासून पुन्हा अमृताचेच बीज तयार होते आणि अमृततत्वच पिकून सर्वत्र समृध्दी नांदते. तेंव्हा उत्तम वृक्षांचे फळांचे बीज जतन करावे ते नष्ट होवू नये याची काळजी घ्यावी. निसर्गातील जैव विविधता टिकून राहण्यासाठी सर्वच प्रकारच्या वृक्ष वेलीची आवश्यकता असते. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नष्ट होत चाललेल्या दुर्मिळ प्रजातींच्या शुध्द बीजाचे जतन होणे आवश्यक आहे. अशा शुध्द बीजाच्या रोपनातून अंकुरलेल्या कोवळया अंकुराची काळजी घेणे आवश्यक आहे.

"सिंपिले ते रोप वरीवरी बरे।
वाळलिया पुरे कोंभ नये।
किंवा बीयाचे अंकुर दग्ध होती"।।

असे सांगनू तुकोबारायांनी नुकत्याच अंकुरीत झाल्लेल्या रोपाची भरपूर पाणी घालून काळजी घ्यावी असा सल्ला दिला आहे. बाळरोपाला वेळोवेळी पाहिजे त्या प्रमाणात पाणीच दिल्या गेले नाही तर त्या वाळलेल्या काष्टाला काय परत कोंभ फुटणार आहेत? असा प्रश्न ही ते विचारतात. म्हणूनच वृक्षाच्या मुळाला भरपूर पाणी घातल्यावरच वृक्ष वाढणार आहे.

"सिंचन करीतां मुळ। वृक्ष बोल्हावें सकळ"।

रोपाच्या संवर्धनातूनच वृक्षाची फळे मिळणे ही कल्पना तुकोबांनी आध्यात्मीक सिध्दांताला जोडून मांडली आहे. पर्यावरण संतुलन साधावे म्हणून आज मोठया प्रमाणात वृक्षारोपन केले जाते. वृक्षारोपनाचे मोठमोठे कार्यक्रम आयोजीत केले जातात, फोटो काढल्या जातात, परंतू लावलेले रोप जगले का? याचा विचार कोणीच करत नाही. दरवर्षी त्याच खड्डयात रोप लावली जातात. त्याचे संगोपन केले जात नाही. संवर्धनासाठी प्रयत्न केले जात नाही या पार्श्वभूमीवर 'बालरोपांची काळजी घ्यावी' हा तुकारामांचा संदेश सर्वांनी अमलात आणला पीजे. तरच जागतीक तापमान वाढीच्या राक्षसाचा आपण निःपात करू शकू अन्यथा पृथ्वीचा नाशासाठी आपणही कारणीभूत ठरू. ज्ञानेश्वर महाराजांनी संत आणि वृक्ष यांची तुलना करतांना असे म्हटले आहे—

"जो खांडावया घावो घाली।
कां लावणी जयानें केली।
दोघा एकचि साउली। वृक्षु दे जैसा"

।ज्ञाने. १२/१९९।।

वृक्ष आपल्या समोर येणारा आपल्याला तोडायला आला की पाणी घालायला आला याचा विचार न करता सारखीच सावली देतो. तेंव्हा अशा वृक्षावर कुऱ्हाड चालवायची की, त्याचा बचाव करायचा हे मानवाणीच ठरवायचे आहे. या वृक्षाला ज्ञानेश्वरांनी त्याग पुरूष म्हणून गौरविले आहे. वश्क्षापासून आपण काय शिकलो हे सांगतांना संत एकनाथ म्हणतात—

"सर्वांगे सर्वभावेसी। सर्वकाळ सर्वदेशी।
पराधीन होआवे सर्वांसी। हे वश्क्षापासी शिकलो"

।। ना.भा. ७/३९३।।

वृक्षापासून मानवाने खूप काही शिकावे असाच नाथांनी उपदेश केला आहे. सर्व काळ, सर्व देशी लोकांसाठीच देह झिजवावा, ही वृक्षाच्या जीवनाची महान शिकवण आहे. ही शिकवण प्रत्येकानी अंगी रूजवावी असा सल्ला ते देतात. तर वृक्ष दानशूर आहे

आपल्या दारी आलेल्या याचकाला तो विन्मुख पाठवत नाही. तर एखादा दाता आपल्या दारी याचक आल्यावर त्याला भरपूर दान देवून त्याची तृप्ती करतो. तसेच वश्क्ष हा मानवरूपी याचकाला पत्र, पुष्प, फुल, मुळ, छाया, साल, लाकूड हे आपल्या जवळील सर्व संतुष्टपणाने देवून निसर्गातील मोठा दाता म्हणून आपल्यासमोर उभा राहतो.

"तेथे माझया मना होइ पक्षीराज।
साधावया काज तृप्तीचेया।
तुका म्हणे क्षणाक्षणा जावो काळ।
गोडी ते रसाळ अंतरेल।"

तुकाराम महाराजांनी वर्णन केल्याप्रमाणे सर्वांनी वृक्षवेली विषयी अशी भूमिका घेतली. तर पर्यावरणातील वृक्षांचे महत्व समजून वृक्षसंवर्धनाला गती मिळेल आणि निसर्गाचा आनंदही लुटता येईल. ज्यांचे रक्षण पर्यावरणाच्या दृष्टीने करायला हवे त्यांचे रक्षण होत नाही आणि नको त्या गोष्टीच वाढल्या जावून काय सार हाती लागणार आहे असा प्रश्न तुकाराम महाराजांनी एका अभंगातून केला आहे.

"तोडूनि पुष्पवाटिका फळवृक्षयाती।
बाभळा राखिती करूनि सारे।।१।।
कोण हि तेणें देखिलें आपुलें।
आणिक पाहिलें सुख काई।।२।।
तुका म्हणे त्यास नाईके सांगता।
तया हाल करीतां पाप नांही"।।३।।

सुगंधी फुलांची पुष्पवाटिका, मधुर फळ वृक्षांच्या जातींचा नाश करून काय साधणार आहे. वृक्षतोड करून मानव पर्यावरणाचा समतोल बिघडवीत आहे. स्वतःचे हित कशात आहे. याचेही भान त्याला नाही. निसर्गावर विजय मिळविण्याच्या नादात स्वतःचा आणि आपल्या भावी पिढयांच्या जीवणावर ढासळत्या पर्यावरणाचा काय परिणाम होईल याची चिंताही तो करीत नाही. वृक्षतोड हे पापाचारण आहे हे सांगूनही त्याला पटत नाही. अविचाराने वागून निसर्गदेवतेचा रोष ओढवून घेतो आहे. हया पुष्पवाटिका म्हणजे आत्मविकास करून घेण्याच्या पायरीतील मोलाचा दगड आहेत. याच्या सानिध्यात मन पवित्र, एकाग्र, शांत होते. त्यांना उध्वस्त करून मानव स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेत आहे. वृक्षराजींचे जतन करून मानवाने स्वतःचे भविष सुरक्षित करावे असा सल्ला तुकाराम महाराज देतात.

२) संतांचा अरण्ये, वने विचार:–

नैसर्गीक वातावरण, एकांत, दाट वनश्री, पशुपक्ष्यांची संगत यामुळे वने म्हणजे नैसर्गिक आनंदाची साठवण ठरतात. निसर्गाच्या सानिध्यात चित्तवृत्ती प्रफुल्लीत होतात. वनाच्या सानिध्यात चिंतनासाठी एकांत मिळतो. गिरीकुहरात मनाची एकाग्रता साधून फक्त परमात्मरूपच दिसू लागते. या अवस्थेचे वर्णन करतांना तुकाराम महाराज म्हणतात.

"ध्यानी योगीराज बसले कपाटीं।
लागे पाठोवाटी तयांचिया।।१।।
तान भूक त्यांचें राखें शीत उष्ण।
झाले उदासीन देहभाव।।२।।
कोण सखें तयां आणिक सोयरें।
असे त्यां दुसरें हरीविण।।३।।
कोण सुख त्यांच्या जीवासि आनंद।
नाहीं राज्यमद घडी तयां।।४।।
तुका म्हणे विष अमृतासमान।
कृपा नारायण करितां होय" ।।५।। तु.गा.३६१

दाट जंगलाचे डोंगरकपाटीमध्ये योगीराज ध्यानाला बसले असता त्यांच्या पाठोपाठ प्रत्यक्ष देवच तिथे येतो. तो एकाग्र झाल्यामुळे त्याचे देहभान हरपते. निसर्ग म्हणजे माझे सगे–सोयरे ही भावना निर्माण होते. पुढे तुकाराम महाराज म्हणतात परमेश्वराला, निर्मिकाला वेळोवेळी आठवायचे असेल तर 'सेवावे अरण एकान्तवास' हा अरण्यातील वासच मानवाला आत्मिक शांती प्रदान करतो. अरण्यात वावरतांना आपोआपच नैसर्गिकता अंगी येते, माणूस निसर्गाच्या जवळ जवळ जातो. आधुनिकतेचा हव्यासापाई जंगल अरण्ये, वने नष्ट करून तिथे मानववस्ती निर्माण करणाऱ्या मानवाला निसर्गाच्या या घटकाचे महत्व अद्यापही समजले नाही. समजले असते तर जंगलांना आगी लागल्या नसत्या. वनात प्रत्यक्ष परमात्माच वास करतो अशी खात्री चांगदेव महाराज देतात

"निरंजन वनी केशव फुलला।
डोंगर शोभला ब्रह्मगिरी।।

तेथे सुमन झाडीत अनुहाते.....
चांगा वटेश्वरी केशव फुलला।।
भ्रमर झाला रस घ्यावया"।।

मानसाच्या मनातील संकुचित भाव जावून त्याच्या मनाला व्यापकत्वाकडे धाव घेण्यासाठी त्याला निसर्गाचा सहवास लाभायलाच हवा. निसर्गाचे वेगळेपण विविधता अरण्ये जीवनात सामावली आहे. याचे वर्णन करतांना रामदास स्वामी म्हणतात—

"नाना वल्लीमध्ये जीवन। नाना फळीफुली जीवन।
नाना कंदीमुळी जीवन। गुणकारके।
ठायी ठायी डोह तुंबती। विशालतळी डबविती।
चबाविती थबाविती। कालवे पाट।।
नानावल्ली बीजांची खाणी। तेहे विशाल धरणी।
अभिनव कर्त्याची करणी। होवोन गेली"।।

अशा अदभूत निसर्गाचे संरक्षण मानवाने जीवापाड केले पाहीजे.

**३) संतांचा पशू—पक्षी विचार:—**

अरण्यामध्ये पशुपक्षीही मोठया प्रमाणावर नांदत असतात. ही वनचरेच सोयरे होवून जातात. पशुपक्षी मुक्तपणे विहार करतात, नाचतात, बागडतात निळोबारायांनी एका अभंगात वर्णन केले आहे—

"नाचती मयूरे रोमांचित दाटी। अमृताची वृष्टी जीवनकळा।
किंवा
कृपाघने वृष्टी केली। प्रतीति विद्युल्लता झळकती"।।

तर जनाबाई म्हणतात—

"वानरी हिंडे झाडावरी। पिली बांधूनी उदरी" तसेच
"लुब्ध झाला मृग। देह विसरला अंग"।।

या वनचरांचा मुक्त क्रिडा पाहून निसर्गही प्रफुल्लीत आनंदीत होतो. परंतू मानवाने मात्र अशा वनचरांच्या मुक्त क्रिडानांही बंदीस्त केले. अरण्यात राहणाऱ्या या वनचरांशी, जलचरांशी, श्वापदांशी मानव वैर का करतात? त्यांची हत्या का करतात? याचे कारण अद्यापही अनभिज्ञ आहे. मानवांचा खेळ होतो आणि या शिकारीपाई वनचरांना आपले जीव गमवावा लागतो. मानवाच्या जीभेचे चोचले पुरविण्यासाठी त्यांचा जीव घेतला जातो. म्हणूनच तुकोबा म्हणतात.

"काय केलें जळचरी। ठिवर त्यांच्या घातावरी।।१।।
हा तो ठायींचा विचार। आहे यातिवैराकार।।२।।
श्वापदातें वधी। निरपराधें पारधी ।।३।।
तुका म्हने खळ। संता पीडिती चांडाळ"।।४।।

पाण्यात राहणाऱ्या माशांनी कोळयाचे काय अपराध केले म्हणून कोळी जाळे टाकून हया माशांना पकडतो तसेच अरण्यातील स्वतःचे जीवन मुक्तपणे जगणाऱ्या निरपराध श्वापदांनी तरी पारध्यांचे असे काय अपराध केले आहेत? की ज्यामुळे पारध्यांनी त्यांची शिकार करावी व त्याला ठार मारून वन्य जीवन नष्ट करून टाकावे. हया अभंगावरून संतांना वन्यजीवा विषयी किती तळमळ होती हे दिसून येते. वन्य प्राणी ही राष्ट्राची संपत्ती आहे. पण आज मात्र या संपत्तीवर मोठया प्रमाणात आघात केला जात आहे. वन्यप्राणी, सरपटणारे प्राणी यांची सरसकट कत्तल करून निर्यात केली जात आहे. पुरूषार्थाच्या नावाखाली आजही शिकार होत आहेत. उच्चभ्रू समाजात प्राण्यांना मारून कातडीपासून बनविलेले कपडे घालण्याची फॅशन सुरू झाली या सर्व गोष्टीमुळे आज बरेचशे प्राणी नष्ट झाले आहेत, तर बरेचशे दुर्मिळ झाले आहे या पार्श्वभूमीवर वन्यजीवांचे रक्षण केले जावे हा संतांचा विचार अनुकरणीय ठरतो.

**४) संतांचा मेघ—वायु, पर्जन्य विचार:—**

पाऊस आणणारा मेघ पर्यावरणाच्या दृष्टीने महत्वाचा. ज्ञानेश्वर महाराज परमात्म्याचे अविनाशी तत्व सांगतांना म्हणतात,

"जैसा मेघांचेनि तोंडे। सिंधु एकें आगें काढे। आणि नदी येरीकडे। भरितीचि असती तेथे वोहटे ना चढे। ऐसा परि पूर्णुची आवडे। परी ते फुली जवं नुघडे। मेघानदीची'। ज्ञाने. १५ ११९.२०

वायू मेघात वाफ भरून तयार करतो आणि लगेच त्याला धक्के देवून दूर करतो. या संदर्भात सांगतांना संत रामदास म्हणतात,

"बायो सुटे सरारां। असंभाव्य पडती गारा"।
दासबोध १६.६.१४

मेघाच्या योगाने वृष्टी होते. आणि सर्वत्र समृध्दी नांदते. पाऊस येतांना तो केवळ माझ्याच साठी आला असे चातकाने कितीही ओरडून सांगीतले तरी मेघाची वृष्टी ही संपूर्ण जगाला पुष्टी देण्यासाठीच असते. या संदर्भात सांगतांना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

"येन्हवी एकल्या बापियाचिया तृषे।
मेघ जगापुरते काय न वर्षे।" ज्ञानेश्वरी ११/९५

पर्जन्याच्या वर्षावासाठी डोंगर असणे आणि गिरीशिखरांमुळे ढग अडविणे ही पर्यावरणाची महत्वाची क्रिया दृष्टान्तातून मांडून संतांनी मेघ, वायू, डोंगर हे पर्यावरणाच्या दृष्टीने किती महत्वाचे आहे याचेच विवेचन केले आहे.

**समारोप:—**

आज मानवाच्या हव्यासामुळे व विविध कारणांमुळे निसर्गाचे संतूलन ढासळले आहे. पाणी, हवा आणि ध्वनी प्रदुषण मोठया प्रमाणात वाढले आहे. पर्यावरणाची दृष्टी लोपली आहे. एकीकडे वाढलेली कारखानदारी त्यातून निर्माण होणारे प्रदूषण, दुसरीकडे जंगलतोड, पशु संपत्तीचा ऱ्हास त्याचा पर्जन्यमानावर गंभीर परिणाम होत आहे. पर्यावरणासाठी आता लोकशिक्षणाची गरज निर्माण झाली आहे आणि नेमकी हिच भूमिका संतांची होती. संतांनी भक्ती, चिंतन आणि मूल्यांची शिकवण दिली. तसेच ज्या पर्यावरणाच्या सानिध्यात मानवी देह वावरणार आहे ते पर्यावरण शुध्द असले पाहीजे अशी त्यांची धारणा होती म्हणूनच त्यांनी निसर्गातील सर्व घटकांचे मोठेपण कधी सिध्दांत, कधी दृष्टांत, कधी उपमा, कधी रूपक स्वरूपात उभे करून गायले आहे. ज्या काळात संतांनी पर्यावरणाची शिकवण दिली. त्या काळात प्रदूषणाची कोणतीही समस्या नव्हती. पर्यावरण घटकावर आजच्या सारखी आक्रमण नव्हती. पर्यावरणाचे संतूलन राखले जात होते. तरी देखील संतांनी दिलेली पर्यावरणाची शिकवण त्यांची दृष्टी किती दुरगामी होती याची जाणीव करून देते. आज पर्यावरण रक्षणासाठी तुकारामांचा पुढील मंत्र जनमानसात रोपीत केला गेला पाहीजे एवढे मात्र निश्चित....

"वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी।
पक्षीही सुस्वरे आळविती।।"

**निष्कर्ष:—**

१) पर्यावरणाचा मोठया प्रमाणात ऱ्हास होत आहे.
२) पर्यावरण रक्षणासाठी लोकशिक्षणाची गरज आहे.
३) संतांच्या वाड्:मयातून पर्यावरण रक्षणासाठी दृष्टी मिळते.
४) संतांचे पर्यावरणविषयक विचार पर्यावरण रक्षणासाठी अनमोल आहेत.
५) संतांचे पर्यावरण विषयक विचारांची अंमलबजावणी केली गेल्यास पर्यावरण रक्षण करता येईल. पर्यावरणाचा ढासळता समतोल राखता येईल.
६) संतांचे पर्यावरणविषयक विचार वसुंधरेच्या रक्षणासाठी उपयोगी ठरतील.

**संदर्भ:—**


१ — देखणे रामचंद्र, संत साहित्यातील पर्यावरण विचार, पदमागंधा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००४, मलपृष्ठ.


**संदर्भ सूची**

**१) ग्रंथसूची**


१) गोसावी र.रा.—पाच भक्तीसंप्रदाय मेहता पब्लीशिंग हाउस पुणे, द्वितीयावृत्ती १९९८
२) घारपूरे विठ्ठल—पर्यावरणशास्त्र पिंपळापुरे प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती जून—५
३) तुळपुळे शं.गो.—पाच संतकवी व्हिनस प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती १९६२— यादवकालीन मराठी भाषा व्हिनस प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती १९७३
४) देशपांडे अ.ना.—प्राचीन मराठी वाड्:मय समीक्षा व जोशी म.रा.व्हिनस प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती जाने. १९९५—प्राचीन मराठी वाड्:मयाचा इतिहास (भाग दुसरा) व्हिनस प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती जाने. १९९६—प्राचीन मराठी वाड्:मयाचा इतिहास (भाग ३रा) व्हिनस प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती ऑगस्ट १९७३
५) मोहरील ल.का.—संत तुकारामांची जीवननिष्ठा सविता प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती फेब्रू.२००३
६) रानडे रा.द.—तुकाराम वचनामृत, ज्ञानेश्वर वचनामृत, रामदास वचनामृत, एकनाथ वचनामृत


**२) संपादित ग्रंथ:—**


१) कमल अशोक—श्री. तुकाराम गाथा, गुरूकुल प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००४
२) दांडेकर मामासाहेब—ग्रंथराज श्री. ज्ञानेश्वरी विश्व हिंदू परिषद प्रथमावृत्ती मार्च १९९७
३) पांगरकर ल.रा.—सार्थ श्री. दासबोध, ढवळे प्रकाशन मुंबई आवृत्ती १५ वी १९९०


**३) पर्यावरण विषयावरील स्फुट लेख**

❑❑❑